॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade
Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/७२८ दिनांक १५/०३/२०२४

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:** विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता व्हावी याकरीता भारत निवडणूक आयोग आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयांनी करावयाच्या कार्यवाही बाबत.

संदर्भ: शासन परिपत्रक क्रमांक: E: ७२०३५९ संकिर्ण- २०२४/प्र.क्र.०३ / विशि-३ मादाम कामा मार्ग, राजगुरु चौक, ४ था मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२ दिनांक : २४ जानेवारी, २०२४

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय परिपत्रान्वये भारता निवडणूक आयोगाने आगामी सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या अनुषंगाने निवडणूक साक्षरता व्हावी याकरीता भारत निवडणूक आयोग आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला आहे. सदर करारानुसार खालील मुद्यांच्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालय स्तरावरुन कार्यवाही करण्याच्या सूचना देण्याबाबत संदर्भाधीन दि.२९ नोव्हेंबर, २०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार, सर्व संलग्नित महाविद्यालयांनी खालील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने अनुपालन करावे.

१. महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये निवडणूक साक्षरता वाढविण्यासाठी विद्यापीठांनी विविध विद्याशाखेतील विद्यार्थ्यांसाठी मतदार शिक्षण व निवडणूक साक्षरतेचे अभ्यासक्रम तयार करुन त्यासाठी आवश्यक ते श्रेयांक देण्यात यावेत.

२. निवडणूक साक्षरतेच्या अनुषंगाने अध्यापन करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करावे. 3. UDISE (युनिफाईड डिस्ट्रीक्ट इन्फॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन), AISHE (ऑॅल इंडिया सर्व्हे फॉर हायर एज्युकेशन) आणि अन्य केटाबेस च्या सहाय्याने महाविद्यालयातील १७ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नोंद घेऊन (१ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै आणि १ ऑक्टोबर) या दिवशी आणि मतदार याद्यांच्या वार्षिक अवलोकनावेळी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन मतदार नोंदणी करण्याच्या अनुषंगाने संस्थात्मक फ्रेमवर्क तयार करणे जेणे करुन वयाचे १८ वर्ष पूर्ण करणा-या विद्यार्थ्यास त्यांचे मतदान ओळखपत्र देण्याचे निवडणूक आयोगाचे उद्दीष्ट पूर्ण होऊ शकेल.

४. नवीन / भावी मतदारांना देशाच्या निवडणूक व्यवस्थेशी पूर्णपणे परिचित करणे आणि त्यांच्यामध्ये मतदार म्हणून नोंदणी करण्याची आणि प्रत्येक निवडणुकीत उत्कट, माहितीपूर्ण आणि नैतिक पद्धतीने भाग घेण्याची इच्छा निर्माण करणे यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये मतदार जागृती करण्यासाठी इतर सह-अभ्यासात्मक उपक्रमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता क्लब (Electoral Literacy Club) निर्माण करुन संदर्भ क्र.१ येथील दिनांक २३ जुलै, २०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचे अनुपालन करावे.

–२–

५. इलेक्टोरल लिटरसी क्लब (ELC) चे उपक्रम आयोजित करण्यासाठी नोडल शिक्षकांचे ऑनलाइन/ऑफलाइन प्रशिक्षण आयोजित करणे आणि ELC उपक्रमांचे नेतृत्व करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित कॅम्पस ॲम्बेसेडर नियुक्त करणे.
६. निवडणूक साक्षरतेच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोग (ECI) ने तयार केलेली संप्रेषण सामग्री महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असलेल्या विविध माध्यमांद्वारे प्रसारित करावी.
७. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांकडून मतदानाची शपथ घेणे, मॉक मतदानाचे आयोजन करणे, EVM-VVPAT यांचे प्रात्यक्षिके, ECI च्या मोबाईल ॲप्सची माहिती, निवडणूक साक्षरतेबाबत स्पर्धा आयोजित करणे असे उपक्रम स्थानिक निवडणूक अधिकारी यांच्या सहकार्याने आयोजित करणे.
८. दि.२५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त व्यापक उपक्रम आयोजित करणे, संदर्भ क्र.२ येथील दिनांक २२ डिसेंबर, २०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचे अनुपालन करावे आणि निवडणुकीच्या काळात विद्यार्थ्यांद्वारे मतदार जागृती मोहीम हाती घेणे.
९. CEDE (Continuous Electoral and Democracy Education) मध्ये सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी क्रेडीट सिस्टीम तयार करणे.
१०. सर्व महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता कार्यक्रमाचे नियमितपणे निरीक्षण करणे, इतर गोष्टींबरोबरच, त्याची उद्दिष्टे पूर्ण करणे आणि सहकार्याचे गैर-राजकीय आणि निःपक्षपाती स्वरूप सुनिश्चित करणे.
११. सुरुवातीच्या दिवसांपासून नैतिक मतदानाच्या पद्धतीचा अवलंब करण्यासाठी आणि विद्यार्थी संघटना स्तरावर मुक्त, निष्पक्ष आणि प्रलोभनमुक्त नैतिक निवडणूका सुनिश्चित करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये जेथे जेथे विद्यार्थी संघटनांच्या निवडणुका घेतल्या जातात तेथे निवडणूक साक्षरता जागरुकता कार्यक्रम सुरू करावेत.
१२. ज्या महाविद्यालयांमध्ये निवडणूक प्रक्रीया पार पडणार आहे अशा महाविद्यालयांच्या इमारतीमध्ये दिव्यांगासाठी प्रवेशयोग्य स्टँडर्ड रॅम्प (१:१० ग्रेडियंट स्लोप), स्त्री- पुरुष यांचेसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आणि सुयोग्य प्रकाश व्यवस्था असेल याची सुनिश्चितता करावी.
१३. वर नमूद केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, दस्तऐवज, अनुभव आणि यशोगाथा उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय आणि अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर कराव्यात.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात प्राधान्याने उपरोक्त निर्देशांचे पालन करून सदर उपक्रम राबविताना उच्च शिक्षण संस्थांनी त्या त्या स्तरावर मुख्य निवडणूक अधिकारी (सीईओ), जिल्हा निवडणूक अधिकारी (DEOS), निवडणूक नोंदणी अधिकारी (EROs), आणि बूथ लेव्हल ऑफिसर (BLOS) यांच्या सहकार्याने व समन्वयाने मतदार शिक्षण आणि मतदार नोंदणीमध्ये भाग घ्यावा, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.